**नि.दि.दा.क्र. ३३५/२०११**

विठ्ठल लबडे व इतर वि. राजाराम व इतर

**नि.क्र.१०६ लगत.**

**वादींतर्फे साक्षीदार क्र.३**

मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| नाव | – | भगवानबाबा सिमाजी घोडके |
| वय | – | ५८ वर्षे, |
| व्यवसाय | – | दुग्ध व्यवसाय, |
| राहणार | – | मिरजगाव, ता. कर्जत, जि. अहमदनगर. |

**उलटतपास प्रतिवादी क्र. १ ते ३, २० व २२ तर्फे विधिज्ञ श्री. एन. एस. खरात यांच्यामार्फत शपथेवर सुरु –**

५. माझे शिक्षण १० वी नापास पर्यंत झालेले आहे. पोलीस स्टेशनला गेल्याची तारिख व महिना मला सांगता येत नाही. मिरजगाव पोलीस स्टेशनच्या पोलीसांनी मला मी सामाजिक कार्यकर्ता असल्यामुळे बोलवले होते. कोणत्या गटामध्ये ऊस होता हे मला माहिती नाही. प्रतिवादी दत्तात्रय याने त्याचा भाऊ याच्याविरोधात ऊस जाऊ देत नाही म्हणुन फिर्याद दिली होती. त्याचा गुन्हा रजिस्टर नंबर मला माहित नाही. लबडे कुटुंबाला कोठे जमिनी आहेत व त्या कशा घेतल्या हे मला माहिती नाही. गट क्र. ९१ व ९२ मध्ये किती क्षेत्र आहे हे मला माहिती नाही. मी पोलीस स्टेशनला गेलो त्यावेळेस क्षेत्र किती आहे याबद्दल चर्चा झाली नाही. हे मला सांगता येणार नाही की, विठ्ठल लबडे, राजाराम लबडे व दत्तात्रय लबडे हे २५ वर्षांपासुन विभक्त राहतात किंवा कसे. हे मला सांगता येणार नाही की, ते विभक्त केव्हापासुन राहतात. हे खरे नाही की, विठ्ठलने मला बोलवुन अशा प्रकारे साक्ष द्या म्हणुन सांगितले. हे खरे आहे की, माझ्या जावायाच्या सांगण्यावरुन मिरजगाव पोलीस स्टेशनला मी विठ्ठल लबडे च्या प्रकरणात गेलो होतो. विठ्ठल लबडे व माझा जावाई यांची ओळख आहे. हे खरे नाही की, मी पोलीस स्टेशनला गेलो नव्हतो व वाद मिटवला नव्हता, माझा जावाई व विठ्ठल लबडे यांचे चांगले संबंध असल्यामुळे मी त्यांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे. हे खरे नाही

की, मी खोटे शपथपत्र दाखल केले आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

**उलटतपास प्रतिवादी क्र ४ ते १९ व २१ यांच्यामार्फत –**

**प्रतिवादी क्र ४ ते १९ व २१ पुकारले असता गैरहजर. करिता त्यांचेविरुध्द उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात येतो.**

स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

माझे समक्ष,

RAMRAO BABURAO RAUT

Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2026.03.09 12:19:16 +0530

(आर. बी. राऊत)

दि.०९/३/२०२६ २ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कर्जत.

जि. अहमदनगर